प्रेस नोट दिनांक ०८/०७/२०२१

**गुण पत्रिका देण्यासाठी ५०० रूपये लाचेची मागणी करून लाच स्विकारली म्हणुन जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जानवळ ता. चाकुर, जि. लातुर येथील मुख्यध्यापक बालाजी रामचंद्र भिंगोले यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करून अटक.**

यातील तक्रारदार यांनी त्यांची इयत्ता ७ वी ची गुणपत्रिका देण्यासाठी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जानवळ, ता. चाकुर, जि. लातुर येथील मुख्यध्यापक बालाजी रामचंद्र भिंगोले यांनी ५००/–रुपये लाचेची मागणी केल्या बाबतची तक्रार दिनांक ०८/०७/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या कडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक ०८/०७/२०२१ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांची इयत्ता ७ वी ची गुणपत्रिका देण्यासाठी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जानवळ येथील मुख्यध्यापक बालाजी रामचंद्र भिंगोले यांनी ५००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदार ५००/–रुपये लाचेची रक्कम घेवुन आलोसे मुख्यध्यापक बालाजी रामचंद्र भिंगोले यांना देण्याकरीता दिनांक ०८/०७/२०२१ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जानवळ येथील त्यांच्या कार्यालयात गेले असता मुख्यध्यापक बालाजी रामचंद्र भिंगोले यांनी पंचासमक्ष स्वत: लाच स्विकारली आहे.

म्हणून तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन चाकुर येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, पोह/लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, पोना/मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, पोकॉ/संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, मपोकॉ/रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र :– मोबाईल क्रमांक ८८८८८४१९६५
२) माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक :– मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४
३) कुमार दराडे पोलीस निरीक्षक :– मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१
४) बबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक :– मोबाईल क्रमांक ९०६७२६६२६४
५) टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक :– १०६४
६) कार्यालयाचा फोन क्रमांक :– ०२४८२–२४२६७४
७) Website :– www.acbmaharashtra.gov.in
८) Mobile App :– www.acbmaharashtra.net
९) Facebook Page :– www.facebook.com/MaharashtraACB

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर